# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरभरतीत ५ टक्के आरक्षण देण्याबाबत**

**(१) १९ (२२-१२-२०१४). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक, वाहक, मेकॅनिक व इतर तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरभरतीत ५ टक्के आरक्षण देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या विचाराधीन प्रस्तावावर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०३-०५-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) राज्य शासनाने पोलीस खात्यातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना ५ टक्के आरक्षण दिले आहे. त्याच धर्तीवर नोकरभरतीत स.प. महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना ५ टक्के आरक्षण देण्याबाबत संचालक मंडळाने ठराव क्र. २०१४:०८:०६ दि. २६.८.२०१४ अन्वये तत्वत: मान्यता दिली आहे. महामंडळस्तरावर कायदेशीर बाबींचा तपासणी/ पडताळणीची प्रक्रीया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे-नगर रस्त्यावरील एस.टी. महामंडळाच्या अनेक बसेस शिरुर शहरात न जाता बाहय मार्गाने जात असल्याबाबत**

**(२) ४५० (१५-१२-२०१४). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील शिरुर तालुका प्रवाशी संघटनेने पुणे- नगर रस्त्यावरील एस.टी. महामंडळाच्या अनेक बसेस शिरुर शहरात न जाता बाहय मार्गाने जात असल्याच्या तक्रारी अनेक वेळा विभागीय नियंत्रक पुणे यांच्याकडे केल्या, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शिरुर तालुक्यातील रांजणगाव गणपती, पंचतारांकित एमआयडीसी मध्ये यश इन चौकाजवळ कामगारांना जाण्यासाठी येण्याच्या सोयीच्या दृष्टीने बस थांबा करण्याची मागणी संघटनेने अनेक वेळा विभागीय नियंत्रक पुणे यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०३-२०१५) :**(१) व (२) हे खरे.

(३) पुणे-नगर मार्गावरील शिरुर बसस्थानक मार्ग जाणाऱ्या बसेसची यादी आगार व्यवस्थापक शिरुर व शिवाजीनगर यांना देण्यात आली असून सदरच्या बसेस शिरुर बसस्थानक मार्गे जाणेबाबत सूचना दिल्या आहेत. शिरुर येथील बायपास मार्गावर प्रशिक्षण वाहन नेमून बसेस शिरुर बसस्थानक मार्गे वळविणेबाबतची कार्यवाही केली आहे.

तसेच शिरुर तालुक्यातील रांजणगांव गणपती, पंचतारांकित एमआयडीसी मध्ये यश इन चौकाजवळ कामगारांना घेण्या/जाण्यासाठी बसथांबा मंजूर करण्यात आला असून त्या ठिकाणी बसेस थांबवून प्रवासी चढ/उतार केली जाते.

---

## पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील एसटी आगारात वाहन चालकाला वाहतूक प्रशिक्षण मिळत नसल्याबाबत

**(३) ८६८ (१५-०१-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील एसटी आगारात वाहन चालकाला वाहतूक प्रशिक्षण अगोदर मिळत नसल्यामुळे प्रवासी एसटीखाली सापडून अपघाती मृत्यूचे वाढते प्रमाण पाहता सुरक्षिततेविषयी साशंकता निर्माण झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल एसटी आगारामध्ये वाढत असलेल्या अपघाताच्या घटना रोखण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण मिळण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०३-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) जानेवारी २०१४ पासून पनवेल आगारातील २३ चालकांना उजळणी प्रशिक्षण देण्यात आले आहे. १६ चालकांना वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशन, चर्चगेट येथे चालन सिम्युलेटर पशिक्षण देण्यात आलेले आहे. तसेच सी.टी.आय, भोसरी, पुणे येथे संगणकीय चालन चाचणी ट्रॅकवर १८ चालकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. चालकांना प्रशिक्षण देण्याची प्रक्रिया ही नियमीतपणे सुरु असुन रा.प. चालकांकडून अपघात होणार नाहीत याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव (जि.बुलडाणा) येथील बस स्थानकाचे आधुनिकीकरण करणेबाबत**

**(४) ९३९ (२२-१२-२०१४). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलडाणा) येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे बस स्थानकातील शेड मोडकळीस आले असून प्रवाशांना बसण्याची सुविधा नाही, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सुलभ शौचालयांची व्यवस्था, वाहनतळाची व्यवस्था, उपहारगृहाची व्यवस्था व इतर मुलभूत व्यवस्था अपुऱ्या पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बस स्थानकावर वाढती प्रवाशांची संख्या पाहता सदर बस स्थानकाचे आधुनिकीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०३-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) बुलडाणा विभागातील खामगांव येथील बसस्थानकाची इमारत सुस्थितीत आहे. बसस्थानक ०९ फलाटांचे आहे. प्रवाशांना बसण्यासाठी बेंचेस सुस्थितीत आहेत. चिरंजीलाल जांगीड या खाजगी ट्रस्ट मार्फत बांधीव पाणपोईद्वारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था चालु आहे. पुरुष व महिलांसाठी प्रसाधनगृहाची व्यवस्था आहे. वाहनतळास "डांबरीकरण" सन २०११ मध्ये करण्यात आले असून ते चांगल्या स्थितीत आहे.

बसस्थानकावर वाहतुक नियंत्रक कक्ष अद्ययावत स्वरुपाचे बांधण्यात आले असून बसस्थानकावर पंखे, पुरेशी लाईटची व्यवस्था करण्यात आली आहे. हिरकणी कक्ष, पोलिस चौकी, उपहारगृह, बुकस्टॉल, जनरल स्टोअर्स, दुरध्वनीकक्ष, दुध व दुग्धजन्य पदार्थाचे स्टॉल, दुचाकी वाहनतळ, रसवंतीगृह, केश कर्तनालय, पिण्याचे पाणी, स्त्री/पुरूष स्वतंत्र प्रसाधनगृह इ. मुलभूत सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. फळ दुकान, मोबाईल शॉपी, सायबर कॅफे, झेरॉक्स या वाणिज्य आस्थापनांची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिवहन प्राधिकरणावर नागरिकांचा प्रतिनिधी घेतला नसल्याबाबत.**

**(५) ११७५ (२३-१२-२०१४). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक परिवहन बरखास्त करून जिल्हा परिवहन प्राधिकारणाची स्थापना होऊन नागरिक व शासन यामध्ये समन्वय साधण्यासाठी या प्राधिकरणावर नागरिकांचा प्रतिनिधी घेतला नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या पहिल्या आठवड्यात आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांचा प्रतिनिधी नसल्यामुळे विविध योजना मार्गी लागण्यासाठी अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०९-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ६८(२) मधील तरतुदीनुसार प्रादेशिक परिवहन प्राधिकरणावर कमाल २ सदस्यांची (शासकीय/अशासकीय) नियुक्ती करण्याची तरतूद आहे. त्यामुळे प्राधिकरणाच्या बैठका वेळोवेळी होत आहेत. अशासकीय सदस्य नसल्याने कोणत्याही योजना प्रलंबित नसल्याने कोणत्याही योजना प्रलंबित असल्याची अडचणी निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रीक्षा, ट्रक, ट्रॅव्हल्स, टेम्पो, धारकांना शासनाने योग्यता प्रमाणपत्र घेण्यास भरमसाठ विलंब दंड आकारत असल्याबाबत**

**(६) १५१० (१५-०१-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यतील रिक्षा, ट्रक, ट्रॅव्हल्स, टेम्पो, धारकांना शासनाने योग्यता प्रमाणपत्र घेण्यास भरमसाठ विलंब दंड आकारत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील वाहनधारकांनी सदर विलंब दंड कमी करणेबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी कोल्हापूर यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विलंब दंड कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०४-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, कोल्हापूर यांनी त्यांच्या दिनांक १.११.२०१३ रोजीच्या बैठकीतील ठरावानुसार ऑटोरिक्षा/मीटर/टुरिस्ट/लक्झरी टॅक्सी/प्रवासी/मालवाहू वाहने यांच्या योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणास विलंब झाल्यास त्यासाठी परवाना निलंबन अथवा निलंबनाऐवजी तडजोड शुल्क आकारणी विहित केली होती. त्यानंतर प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे दि. ४.१.२०१४ व दि.२४.१.२०१४ रोजीच्या निर्णयाप्रमाणे विलंब दंड (तडजोड) शुल्क कमी करण्यात आले आहे.

---

**आरे बुद्रुक (ता.रोहा, जि.रायगड) गावाच्या पुनर्वसनाबाबत**

**(७) १७५५ (२३-१२-२०१४). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा शहरापासून जवळच असलेल्या आरे ब्रुदुक या गावाला एकूण ९३ घरे असून सुमारे ५०० च्या आसपास लोकांची वस्ती आहे व हे गाव संपूर्ण डोंगराच्या पायथ्याशी वसलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) सन २००० मध्ये या गावाच्या एका बाजूला मोठ्या प्रमाणात दरड कोसळून ५ ते ६ घरे उद्ध्वस्थ झाली होती, तसेच ५ जुलै, २००६ रोजी पुन्हा दरड कोसळ ल्याने गावातील जनता भयभित झाल्याने संबंधीत अधिका-याने घटनास्थळी पाहणी करून या गावाचे पुनर्वसन करण्याचे ठरविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापही या गावाचे आश्वासन दिल्याप्रमाणे पुनर्वसन न झाल्याने आरे ब्रुदुक हे गाव आता धोकादायक स्थितीत असून बाजूला असलेल्या डोंगराला भेगा पडत आहेत त्यामुळे हा मालकीचा भाग असलेला डोंगर खचल्यास मोठ्या प्रमाणात गावावर आपत्ती ओढवण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अनेक वर्षापासून धोकादायक स्थितीत असलेल्या या गावाच्या पुनर्वसनासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०३-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) रायगड जिल्ह्यातील दरड कोसळण्याची शक्यता असलेल्या गावांची संबंधित तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत पाहणी करण्यांत आली व त्या अनुषंगाने दरड कोसळण्याच्या घटनेचा अभ्यास करणेसाठी रायगड जिल्ह्यातील आरे बुद्रुक या गावासह इतर ३४ गावांचे सर्वेक्षण करणेबाबत उपमहासंचालक तथा विभागप्रमुख भारतीय भूवैज्ञानिक संस्था नागपूर यांना कळविण्यांत आले आहे.
(४) दरम्यान कुटुंबाचे पुनर्वसन करण्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यांत आली होती. तथापि, जमिनीचे मालकाने भूसंपादन प्रक्रीया स्थगित करण्यासाठी मा. दिवाणी न्यायालय अलिबाग येथे रे.मु.नं. ६४/२००२ अन्वये दावा दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेले होते. दाव्याचा निकालही दिनांक ६/७/२००९ रोजी लागला असून मा. न्यायालयाने सदरचा दावा कोणतेही आदेश न देता निकाली काढला आहे. सदर जमीन मालकाने त्यांची पर्यायी जमीन गट नं. १४५/५ क्षेत्र १.५१.३ हे.आर. देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यानुसार पुनर्वसनाची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

---

## जळगांव येथे शहर बस सेवा सुरु करण्याच्या मागणीबाबत

**(८) २१९८ (१५-०१-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव शहरामध्ये शासनाची शहर बस सेवा सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी निवेदनाद्वारे दिनांक १८ ऑक्टोबर, २०१४ रोजी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नियोजनावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०३-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) जळगांव शहर बसस्थानक ते उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि केंद्रीय विद्यालय जळगांव या मार्गावर दिनांक १२.०१.२०१५ पासून जळगांव आगारामार्फत तीन नियतांद्वारे ६० परतीच्या फेऱ्या सुरु करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विठ्ठलवाडी बस डेपो पुन्हा सुरु करणेबाबत**

**(९) २४५४ (१५-०१-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शहरालगत असलेल्या विठ्ठलवाडी येथील राज्य परिवहन महा मंडळाचा बसडेपो सध्या बंद स्थितीत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या ठिकाणाहून अत्यंत मोठ्या संख्येने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बस डेपो पुन्हा सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०३-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) विठ्ठलवाडी आगाराची नियते वाडा, मुरबाड, भिवंडी, शहापूर व कल्याण या आगारात वर्ग करण्याबाबतचा निर्णय महामंडळ संचालक मंडळाचा ठराव क्र. २०१३:०६:१३ दिनांक २५/०६/२०१३ अन्वये घेण्यात आला. त्यानुसार सर्व फेऱ्या पुर्वीप्रमाणेच विठ्ठलवाडी येथील बसस्थानक मार्गेच चालू राहणार आहेत. सद्यस्थितीत विठ्ठलवाडी आगार पुर्ण क्षमतेने कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटण तालुक्यातील भूकंपग्रस्तांना भूकंपग्रस्ताचे दाखले मिळणेबाबत**

**(१०) २९७३ (२३-१२-२०१४). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील पाटण हा भूकंपग्रस्त मतदारसंघ असून या मतदारसंघात सातत्याने लहानमोठे भूकंपाचे धक्के बसतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भूकंपाच्या धक्क्यामुळे या विभागात मोठ्या प्रमणात घरांची पडझड होवून घरांचे मोठे नुकसान होते या नुकसानग्रस्तांना घरांची पुर्नबांधणी करण्याकरिता अंशत: बाधित असणाऱ्यांना २४००/- रुपये व पूर्णत: बाधित असणाऱ्यांना ४८००/- रुपये शासनाकडून तातडीची मदत देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पाटण तालुक्यातील भूकंपग्रस्ताना भूकंपग्रस्तांचे दाखले देणेसंदर्भात दिनांक १५ जून, २००९ रोजी शासनाच्या वतीने राज्याचे तत्कालीन मदत व पुनर्वसन राज्यमंत्री यांनी विधानसभा सभागृहात शासनाच्या वतीने आश्वासन दिले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने पाटण तालुक्यातील भूकंपग्रस्तांना भूकंपग्रस्ताचे दाखले देण्याची कार्यवाही पूर्ण करण्याकरिता पत्रव्यवहार केला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पाटण तालुक्यातील भूकंपग्रस्त जनतेकडून दाखल्याची तसेच नुकसानग्रस्तांना २० वर्षापूर्वीचा असणारा हा मदतीचा निकष शासनाने बदलण्याची गरज आहे या मागण्या सातत्याने होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने याबाबत कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१५) :**(१) होय.

(२) शासन निर्णय क्र. सीएलएस-११/०५/प्रक्र. २३९/म-३ दि. ९ जानेवारी, २००६ अन्वये अंशत: बाधित घरांसाठी २४००/- रुपये व पुर्णत: बाधित घरांसाठी ४८००/- रुपये शासनाकडून तातडीची मदत देणेत येत होती, तथापि शासन निर्णय क्र. सीएलएस-२०१२/प्र.क्र.१५७/म-३, दिनांक ३० जानेवारी २०१४ अन्वये अंशत: पडझड झालेल्या पक्क्या व कच्च्या घरांसठी १९००/- रुपये, मोठ्या प्रमाणावर पडझड झालेल्या पक्क्या घरांसाठी ६३००/- रुपये व कच्चा घरांसाठी ३२००/- रुपये व पूर्णत: पडझड झालेल्या पक्क्या घरांसाठी ३५०००/- व कच्चा घरांसाठी १५०००/- इतकी मदत देय आहे.

(३) होय.

(४) होय.

(५) दाखल्याची मागणी होते आहे, हे खरे आहे. नुकसानग्रस्तांना मदतीचा निकष शासन निर्णय क्र. सीएलएस२०१२/प्र.क्र.१५७/म-३, दिनांक ३० जानेवारी, २०१४ अन्वये बदलणेत आलेली आहे.

(६) प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

### सावली तालुक्यातील (जि.चंद्रपूर) बसस्थानकाचे बांधकाम तातडीने पूर्ण करणेबाबत

**(११) ३०२५ (१५-०१-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालूक्याची निर्मिती होवून २२ वर्ष झाले असून आजही राज्य परिवहन महामंडळाचे एस.टी.रोड सावली शहरामधून जाणा-या राज्य महामार्गावर असल्याने मोठ्या प्रमाणात असलेली रहदारी व अरुंद रस्त्यामुळे अनेकवेळा अपघात होवून जिवितहानी झालेली असून कायदा आणि सुव्यवस्थेवर परिणाम झालेला आहे. त्यामुळे सावली येथे मंजूर असलेल्या बसस्थानकाचे बांधकाम तातडीने पुर्ण करण्याची मागणी लोकप्रतिनिधींसह नागरिकांनी वेळोवेळी केलेली असल्याची माहिती दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावली येथे मंजूर असलेल्या बसस्थानकाचे बांधकाम तातडीने पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०३-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) सावली येथे राज्य परिवहन महामंडळाच्या ४०x१० फूट आकाराचा प्रवाशी निवारा बांधला आहे. सावली येथून लगतच्या जाणाऱ्या ६० व येणाऱ्या ४० फेऱ्या आहेत. सावली येथून सुरु होणाऱ्या ४ व संपणाऱ्या ४ फेऱ्या आहेत. सावली येथे छोटे खानी बसस्थापनक प्रस्तावित असून सावली येथे राज्य परिवहन महामंडळाची स्वत:ची जागा नाही. सावली शहरातील लेंडार बोंडी तलाव बुजवुन त्यासाठी बसस्थानक बांधण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन होता. तथापि सदरची जागा तलावाची असल्याने पाण्याचा निचरा होणे त्रासदायक होत राहील. त्यामुळे बसस्थानकांकरीता योग्य राहील अशी पर्यायी जागा शोधण्याच्या प्रादेशिक व्यवस्थापक, नागपूर व विभाग नियंत्रक यांना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील गिरणा पाटबंधारे (जलसंपदा) प्रकल्पामधील सन १९७६ पूर्वीच्या पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरविण्याबाबत

**(१२) ३३५१ (२३-१२-२०१४). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील गिरणा पाटबंधारे (जलसंपदा) प्रकल्पामधील सन १९७६ पूर्वीच्या पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरविण्याबाबत दिनांक ३१ जुलै, २०१४ रोजी नाशिक आयुक्तालयाने शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी अंदाजपत्रके पाठविली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविणे आवश्यक असल्यामुळे उक्त अंदाजपत्रकांना प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अंदाजपत्रक व प्रस्तावांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविणे या योजनेअंतर्गत सद्य:स्थितीत पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे नाशिक जिल्ह्यातील गिरणा प्रकल्पातील पुनर्वसित गावांना नागरीसुविधा पुरविण्याच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता

प्रदान करण्यात आलेली नाही. व यासंदर्भात नियोजन विभागाच्या सूचनांनुसार सदर योजनेचा मूल्यमापन समितीमार्फत समितीच्या मान्यतेनंतर सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनेक भागात खरीप पिकांच्या हंगाममध्ये पुरेसा पाऊस न पडल्याने खरीप पिकांच्या झालेल्या नुकसानाबाबत**

**(१३) ३३६५ (२२-१२-२०१४). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक भागात तसेच प्रामुख्याने नाशिक जिल्हयातील नांदगाव, मालेगांव, येवला व अन्य तालुक्यात खरीप पिकांच्या हंगाममध्ये पुरेसा पाऊस न पडल्याने खरीपाची पिके वाया जावून दुष्काळाची स्थिती निर्माण झालेली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळाची स्थिती जाहीर करुन निवारण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करीत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०३-२०१५) :**(१) होय.
राज्यातील एकूण २३८११ गावात खरीप पिकांची पैसेवारी ५० पैशांपैक्षा कमी आल्याने दिनांक १४.१.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये नाशिक जिल्हयातील येवला, मालेगांव व नांदगांव या तालुक्यातील सर्वच्या सर्व गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेली आहे. तसेच नाशिक जिल्हयातील एकूण १९६० गावांपैकी १३४६ गावांची पैसेवारी ५० पैशांपैकी कमी आलेली आहे.
(२) टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या गावांत शासन निर्णय दिनांक १४.१.२०१५ अन्वये खालीलप्रमाणे उपाययोजना लागू केलेल्या आहेत.

१) जमीन महसूलात सुट
२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन
३) शेतीची निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती
४) वीज बिलात ३३.५% इतकी सुट
५) परीक्षा शुल्कात माफी (इयत्ता १० वी व १२ वी)
६) रोहयो अंतर्गत कामांच्या निकषांत काही प्रमाणात शिथीलता.
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टॅकर्सचा वापर.
८) टंचाई जाहीर केलेल्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण शहरातील एसटी स्टँड व एसटी डेपोचा बीओटी तत्वावर विकास करण्याबाबत**

**(१४) ४०८० (१५-०१-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण येथून मोठ्या प्रमाणावर बसेसची सेवा देण्यात येणे व लोकसंख्येचे घनता जास्त असणे, प्रवाशांची क्षमता वाढणे, पायभूत सुविधांचा अभाव यामुळे कल्याण शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेले एसटी स्टँड व एसटी डेपो यांचा नाशिकच्या ठक्करबाप्पा बस स्टॅण्ड प्रमाणे बीओटी तत्वावर विकास करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०३-२०१५) :**(१) व (२) कल्याण येथील लोकसंख्येच्या घनतेप्रमाणे प्रवासी संख्या जास्त असल्याने बसस्थानकात प्रवाशांकरीता मोठया प्रमाणावर बससेवा पुरविण्यात आली असून प्रवाशांकरीता सर्व प्रवासी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. तसेच कल्याण बसस्थानकाचा बी.ओ.टी तत्वावर विकास करण्याचे सध्या महामंडळाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात स्थानिक बेरोजगाराना नोक-यामध्ये प्राधान्य मिळावे याकरिता एसटी महामंडळामध्ये विभागीय स्तरावर भरती करण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(१५) ७०८१ (०८-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्थानिक बेरोजगाराना नोक-यामध्ये प्राधान्य मिळावे याकरिता एसटी महामंडळामध्ये विभागीय स्तरावर भरती करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व आतापर्यत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त एसटी महामंडळामध्ये स्थानिक बेरोजगारांना नोक-या देण्यासंदर्भात सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) रा.प.महामंडळाकडे नोकर भरती करतांना सर्व विभागात एकाच दिवशी एकाच वेळी भरती प्रक्रीया अंतर्गत लेखी परिक्षा घेतली जाते.

सरळसेवा भरती सन २०१५ अंतर्गत स.प. महामंडळामध्ये सर्व विभागात चालक (कनिष्ठ) पदाची भरती प्रक्रिया राबविली जात असून भरती प्रक्रीये अंतर्गत पात्र उमेदवार कोणत्याही विभागासाठी अर्ज करुन शकतात व त्याच विभागात त्यांची नियुक्ती करण्यात येते.
(३) शासनामार्फत वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार रा.प. महामंडळात भरतीप्रक्रिया राबविण्यात येते. महामंडळाच्या भरती प्रक्रीयेमध्ये त्या त्या जिल्हयातील स्थानिक पात्र उमेदवार भाग घेऊ शकतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रामटेक-कन्हान (जि.नागपूर) रेल्वे लाईनवर असलेले मानवरहित रेल्वे फाटक सुरु करणेबाबत**

**(१६) ९५१६ (१०-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक-कन्हान (जि.नागपूर) रेल्वे लाईनवर असलेले मानवरहित रेल्वे फाटक अचानकपणे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान बंद करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे रेल्वे फाटक बंद केल्याबाबत तेथील नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिका-यांकडे विरोध दर्शविला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरचे रेल्वे फाटक तातडीने सुरू करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-१०-२०१५) :**(१) रामटेक-कन्हान (जि.नागपूर) रेल्वे लाईन वर २०१४ मध्ये कोणतेही मानवरहित फाटक बंद करण्यात आलेले नाही.
परंतु, रामटेक-कन्हान विभागातील समपार फाटक क्र. केआर -१० हे सन २००२ मध्ये बंद करण्यात आले होते. तसेच समपार फाटक क्र.के.आर-५ व केआर-९ हे २००६ मध्ये बंद करण्यात आले होते. वरील तिन्हीही समपार फाटकावरील वाहनांची वाहतूक खुपच कमी असल्याकारणाने तसेच जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या संमतीने बंद केले होते.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लोहारा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) माकणी येथे मंजूर असलेले बसथांबा अद्यापपपावेतो बांधण्यात न आल्याबाबत**

**(१७) ९९६१ (०७-०४-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहारा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) माकणी येथे मंजूर असलेले बसथांबा अद्यापपावेतो बांधण्यात न आलेल्याबाबत व सदर बसथांबा बांधण्यास विलंब होण्यास कारणीभूत

असणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होणेबाबत उमरगा-लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दि.२९/८/२०१२ रोजी लेखी निवेदनाव्दारे विनंती केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) माकणी येथे मंजूर असलेल्या बसथांबा बांधण्यास किती कालावधी लागेल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रवाशी निवा-याच्या बांधकामासाठी आवश्यक असलेली जागा महामंडळाच्या ताब्यात आली नाही. महामंडळाची आर्थिक स्थिती पाहता जागा ताब्यात आल्या नंतर शासन व लोकप्रतिनिधी यांचेकडून निधीच्या उपलब्धतेनुसार माकणी येथे प्रवाशी निवारा बांधणेबाबत महामंडळाच्या स्तरावर कार्यवाही करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यात राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभागीय कार्यालय अद्‌यापही तयार न झाल्याबाबत**

**(१८) १२९६४ (०४-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली हा जिल्हा अस्तित्वात येऊन पंधरा वर्षाचा कालावधी होउुन ही जिल्ह्याचे ठिकाणी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभागीय कार्यालय अद्‌यापही अस्तित्वात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली येथे एस.टी. महामंडळाचे विभागीय कार्यालय सुरु करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी नोव्हेंबर, २०१४ वा त्या सुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१५) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी, हिंगोली व बसमत या आगारांचे प्रशासकीय कामकाज सध्या परभणी येथील विभागीय कार्यलयामार्फत करण्यात येत आहे परभणी विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत हिंगोली जिल्ह्यामधील वरील तीन आगाराव्यतिरिक्त परभणी, जिंतूर, गंगाखेड व पाथरी या आगारांचे प्रशासकीय कामकाज देखील करण्यात येत आहे. परभणी विभाग येथूनकेवळ सात आगारांचे प्रशासकीय कामकाज चालविण्यात येते सदरचे कामकाज परभणी विभागीय कार्यालय येथून सक्षमपणे पार पाडण्यात येत असून, हिंगोली जिल्ह्याअंतर्गत कोणत्याही आगारांची गैरसोय होत नाही. हिंगोली जिल्ह्यातील तीन तालुक्यांसाठी नविन विभागीय कार्यालय व कार्यशाळा सुरु करणे सद्य:स्थितीत महामंडळाला आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य नाही.

---

**कोल्हापूर-कोकण रेल्वेमार्ग जोडण्याबाबत**

**(१९) १३०७६ (०७-०४-२०१५). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण रेल्वेचा वैभववाडीतील आर्चिर्णे नावळे वरुन बोरबेट कोल्हापूर असा कोल्हापूर कोकणाला जोडणा-या ६४ कि.मी. च्या रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पश्चिम महाराष्ट्राबरोबर कोकणचा विकासाचा दृष्टीकोन ठेवून कोल्हापूर-कोकण रेल्वेमार्ग जोडण्याबाबत कोल्हापूर व कोकणातील जनतेने व विशेषतः सिंधुदुर्ग जिल्हा व्यापारी महासंघाने शासनाकडे वेळोवेळी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-१०-२०१५) :**(१) नाही, तथापि वैभववाडी-कोल्हापूर मार्गे गगणबावडा असा एकूण १०५ कि.मी. लांबीचा कोकणला जोडणा-या नियोजित नवीन रेल्वे मार्गाचा सर्व्हे करण्यात आला आहे.

(२) सिंधुदुर्ग जिल्हा व्यापारी महासंघाने अशा प्रकारची मागणी शासनाकडे केलेला दिसून येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मोटार ड्रायव्हिंग स्कूलची पडताळणी करण्याबाबत**

**(२०) १६२६८ (२६-०५-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक वाहन प्रशिक्षण स्कूल हे नियमाकडे दुर्लक्ष करुन वाहन चालवित असल्याने वाहन प्रशिक्षण स्कूलमधील तयार झालेल्या चालकांकडून मोठया प्रमाणात अपघात होत असून अशा वाहन प्रशिक्षण स्कूलची तपासणी करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१५ वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तपासणी करण्यात आलेल्या वाहन प्रशिक्षण स्कूलपैकी किती वाहन प्रशिक्षण स्कूल नियमबाहय असल्याचे आढळून आले आहे,

(३) याप्रकरणी तपासणीअंती वाहन प्रशिक्षण स्कूल नियमबाहय चालविण्यात येत असलेल्या वाहन प्रशिक्षण स्कूलवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२८-०८-२०१५) :**(१) राज्यातील मोटार वाहन प्रशिक्षण संस्थांद्वारे दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी व निकृष्ट दर्जाच्या तसेच अपुरी साधने/ उपकरणे असणाऱ्या किंवा गैरप्रकार करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने परिवहन आयुक्त कार्यालयाने दि. ४ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या परिपत्रकाद्वारे राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांना राज्यातील मोटार ड्रायव्हिंग स्कूलच्या तपासणीची विशेष मोहिम राबविण्याची सूचना दिली.

(२) व (३) तपासणी मोहिमेत एकूण १९२४ मोटार वाहन प्रशिक्षण संस्थांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये नियमांची पूर्तता न करणाऱ्या एकूण ११० प्रशिक्षण संस्थांची मान्यता रद्द केली आहे. तसेच ४८ प्रशिक्षण संस्था निलंबित करण्यात येऊन ४५७ प्रशिक्षण संस्थांच्या संचालकांना नोटीस जारी करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा येथील उधना अमरावती गाडी गेल्या तीन वर्षापासून बंद असल्याबाबत

**(२१) १६४५५ (११-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोंडाई (जि.धुळे) येथील उधना अमरावती गाडी गेल्या तीन वर्षापासून उन्हाळ्याच्या सुट्टीत सुरु असते परंतु या वर्षी ही गाडी सुरु न झाल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही गाडी पूर्ववत चालू करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. दिवाकर रावते (०१-१०-२०१५) :**(१) व (२) धुळे विभागातील दोडाईचा आगाराकडून तसेच अमरावती विभागातील अमरावती आगाराकडून उधना अमरावती अशा मार्गावर यापूर्वी कोणतीही फेरी चालविण्यात आलेली नाही,

परंतू धुळे विभागातील दोंडाईचा आगाराकडून दोंडाईचा उधना या मार्गावर अक्कलकुआ मार्गे सकाळी ०६.३० वा तसेच नवापूर मार्गे सकाळी ०७.१५ व ११.०० वा याप्रमाणे तीन फेऱ्या नियमित चालनात आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहादा बस थेट धुळे स्थानकापर्यंत नेण्याबाबत

**(२२) १६५२१ (१२-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे आगारा तर्फे देवपूर बसस्थानक कार्यान्वित करण्यात आले असून या बसस्थानकातून शहादाकडे येणा-या बसेस सुटत आहेत. शहादा बस थेट धुळे स्थानकापर्यंत नेण्याबाबत प्रवाशांनी अनेकदा मागणी केलेली आहे असे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत प्रवाशांच्या सोयीसाठी स्थानकापर्यंत नेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. दिवाकर रावते (२३-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) धुळे शहराच्या विस्तार लक्षात घेता प्रवाशांना सुविधेसाठी शहरातील देवपूर या उपनगरात बी.ओ.टी. तत्वावर नविन बसस्थानक बांधण्यात आलेले आहे. दि. १८.०५.२०१३ पासून नविन देवपूर बसस्थानक प्रवासी सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात आले व धुळे शहरातुन देवपूर मार्गे बाहेरगांवी जाणाऱ्या व येणाऱ्या फेऱ्यांवरील बसेस देवपूर बसस्थानकावर आणून तेथून प्रवासी चढउतार सुरु करण्यात आले होते. तथापि, प्रवाशांची सततची मागणी विचारात घेवून देवपूर बसस्थानकापर्यंत येणाऱ्या सर्व फेऱ्या पूर्ववत धुळे मध्यवर्ती बसस्थानकापर्यंत आणून व परत तेथूनच सोडण्यात येत आहेत, त्यामुळे प्रवाशांची सोय झाली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य परिवहन मंडळाला दोन हजार कोटींचा तोटा झाल्याबाबत**

**(२३) १६६३८ (०६-०८-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एसटी प्रवासी संख्येत दिवसेंदिवस होणारी घट, बंद पडलेल्या एस.टी. गाड्यांची वाढती संख्या, सोयी-सुविधांची कमतरता यामुळे राज्य परिवहन मंडळाला दोन हजार कोटींचा तोटा झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एस.टी.ला होणा-या उक्त तोटयापासून बाहेर काढण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
सन २०१३-१४ अखेर महामंडळास रु. १२९४.३३ कोटी संचित तोटा होता. सन २०१४-१५ च्या अलेखापरिक्षित वार्षिक लेख्यांनुसार सन २०१४-१५ मध्ये महामंडळाला रु ३८२.१३ कोटी इतका तोटा झाला असुन संचित तोटा रु. १६७६.४६ कोटी आहे.

(२) प्रवासी संख्येत वाढ करण्यासाठी प्रवासी वाढवा योजना, नैमित्तिक करारावर देण्यात येणाऱ्या असेसच्या अटीमध्ये बदल, नविन वातानुकलित शिवनेरी बसेसची खरेदी सक्षम मार्ग तपासणी व अवैध वाहतुकीद्वारे उत्पन्न गळती रोखणे, प्रवासी आकर्षित करण्यासाठी प्रवास भाडयात सवलत, वार्षिक सवलत कार्ड, मासिक / त्रैमासिक कार्ड योजनांना व्यापक प्रसिध्दी देऊन प्रवासी व उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करण्यात येत आहे.
रा.प. वाहनांचे मार्गस्थ बिघाडाचे प्रमाण कमी करण्याकरिता विविध स्तरावर प्रयत्न करण्यात येत असून रा.प.गाडयांचा गत वर्षीचा (सन २०१३-१४) दर ०.२७ इतका असून या वर्षी (सन २०१४-१५) ०.२६ इतका कमी झाला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिवसा (ता.जि.अमरावती) येथील एसटी बसमधील काही प्रवाशांना तिकिट न देता त्यांचे पैसे खिशात टाकणाऱ्या वाहकाने तपासणी अधिकाऱ्यांशीच अरेरावी केल्याबाबत**

**(२४) १६८१३ (११-०८-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिवसा (ता.जि.अमरावती) येथील एसटी बसमधील काही प्रवाशांना तिकिट न देता त्यांचे पैसे खिशात टाकणाऱ्या वाहकाने तपासणी अधिकाऱ्यांशीच वाद घातल्याचे दिनांक २१ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुरुकुंज बसस्थानकावर राज्य परिवहन महामंडळाच्या अमरावती तपासणी अधिकाऱ्यांचे पथक रामटेकवरुन मोझरी मार्गे अमरावती, आकोट जाणारी बस क्र.एम.एव ४० वाय ५४५३ ही बस उक्त बसस्थानकावर आली असताना वरील प्रकार उघडकीस आला हे पाहता संबंधित बसवाहकांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) दि.२१.०५.२०१५ रोजी अशी कोणतीही घटना घडल्याचा अहवाल प्राप्त नाही. तथापी, दि.१९.०४.२०१५ रोजी तपासणी अधिका-यांनी रामटेकवरुन मोझरी मार्गे अमरावती, आकोट जाणारी बस क्र.एमए०-४० वाय-५४५३ ही बस गुरुकुंज बसस्थानकावर तपासली असता सदर बसमध्ये १८ प्रवाशांपैकी २ प्रवासी विनातिकिट प्रवास करतांना आढळले, कर्तव्यावरील वाहकाने विनातिकिट आढळलेल्या प्रवाशांकडून बसमध्ये बसलेल्या ठिकाणीच नागपूर ते अमरावती प्रवासाकरिता प्रत्येकी रु.१६४/- प्रमाणे रु.३२८/- प्रवासभाडे वसुल केले होते मात्र तपासणी स्थळापर्यंत प्रवाशांना तिकिट दिलेले नव्हते, असे तपसणीअंती निदर्शनास आले. घटनेच्या अनुषंगाने तपासणी अधिका-यांनी वाहकाकडे बयाण मागितला असता वाहकाने बयाण देण्यास नकार दिला. सदर प्रकरणी राज्य परिवहनद्वारा वाहकास दि.१७.०६.२०१५ पासून निलंबित करण्यात येवून दि.०६.०७.२०१५ च्या पत्रान्वये त्याच्यावर दोषारोप पत्र बजावण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाच्या मुंबई सेंट्रल आगारात कर्मचाऱ्यांच्या बऱ्याच जागा रिक्त असल्याबाबत**

**(२५) १६८७३ (०६-०८-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या मुंबई सेंट्रल आगारात कर्मचाऱ्यांच्या बऱ्याच जागा रिक्त आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे यावर्षीच्या एप्रिल, मे या सुट्टीच्या हंगामामध्ये जास्त गाड्या सोडून अधिकतम उत्पन्न मिळण्याची एसटी ला संधी असताना केवळ अपु-या कर्मचा-यामुळे सुट्टीच्या हंगामातही एसटीला पुरेसे उत्पन्न मिळून शकत नाही तसेच हजारो प्रवाशांची गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई सेंट्रल आगारात कर्मचा-यांच्या नेमणूका करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-११-२०१५) :**(१), (२) व (३) मुंबई सेंट्रल आगारात कर्मचाऱ्यांच्या बऱ्याच जागा रिक्त आहेत हे पुर्णत: सत्य नसून, वाहक-२३, सहाय्यक-१४ व लिपिक-६ अशा एकूण ४३ कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त असून चालकांची मंजूरी इतकी पदे नियुक्त आहेत. तसेच माहे मे ते जुलै २०१५ या कालावधीत लिपिक-२, वाहक-२, व सहाय्यक-१२ अशा एकूण १६ कर्मचाऱ्यांना नियुक्त्या दिलेल्या आहेत.

राज्य परिवहन महामंडाळाच्या मुंबई आगारात माहे मे-२०१५ मध्ये गतवर्षीची तुलना करता सुमारे ०१ लाख कि.मी. जादा चालविले असून आगाराच्या उत्पन्नात गतवर्षीची तुलना करता माहे मे-२०१५ मध्ये सुमारे रुपये २३ लाखाने वाढ झालेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील एसटी महामंडळाच्या २५० डेपो पैकी २११ डेपो तोटयात चालत असल्याबाबत**

**(२६) १७०७१ (११-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एसटी महामंडळाच्या २५० डेपोपैकी २११ डेपो तोटयात चालत असल्याने एसटीच्या तोटयात वाढ होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटीच्या सर्व आगारातून बसेस चालविल्या जात असून कर्मचारी संख्या, बसेससाठी लागणारी साहित्य सामुग्री, वीज, डिझेल, इत्यादीचा खर्च महामंडळाच्या उत्पनापेक्षा जास्त असल्याने तोटयात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एसटी महामंडळाचा तोटा कमी करुन डबघाईला आलेले एसटी महामंडळ सुस्थितीत आणण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. दिवाकर रावते (१९-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

एकूण संचित तोटा वाढत आहे, मात्र सन २०१३-१४ च्या (रु.५७२.६२ कोटी) तुलनेत सन २०१४-१५ मध्ये (रु.३८२.१३ कोटी) तोटा कमी झाला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राज्य परिवहन महामंडळाचे उत्पन्नात वाढ करण्यासाठी प्रवासी वाढवा योजना, नैमित्तिक करारावर देण्यात येणा-या बसेसच्या अटीमध्ये शिथिलता आणने, हिरकणी सेवा आरामदायक होण्यासाठी पुश बॅक शिट बसविणे, नविन वातानुकुलित शिवनेरी बसेसची खरेदी, सक्षम मार्ग तपासणी व अवैध वाहतुकीद्वारे उत्पन्न गळती रोखणे, प्रवासी आकर्षित करण्यासाठी समाजातील २४ विविध घटकांना ५० ते १०० टक्केपर्यंत प्रवास भाड्यात सवलत, वार्षिक सवलत कार्ड, मासिक/त्रैमासिक कार्ड योजनांना व्यापक प्रसिध्दी देऊन प्रवासी व उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करण्यात येतात.

वरिल उपाययोजनांमुळे सन २०१३-१४ मध्ये २१९ आगार तोट्यात होते, ही संख्या कमी होऊन सन २०१४-१५ मध्ये २११ आगार तोट्यात आले, म्हणजेच २०१३-१४ च्या तुलनेत सन २०१४-१५ मध्ये तोट्यातील आगारांची संख्या ८ ने कमी झाली आहे.

---

**राज्य परिवहन महामंडळाच्या तोट्यास वाहकच जबाबदार असल्याचा निष्कर्श महामंडळाने काढला असून बडतर्फी, वेतनवाढ रोखणे-कपात करण्याबाबत**

**(२७) १७३२३ (०६-०८-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या तोटयास वाहकच जबाबदार असल्याचा निष्कर्श महामंडळाने काढला असून बडतर्फी, वेतनवाढ रोखणे-कपात करणे या उपाययोजनांतरही परिणाम होत नसल्याने अपहार करणा-या वाहकांवर फौजदारी कारवाई करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असल्याचे माहे १९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळून येणा-या वाहकावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-१०-२०१५) :**(१) (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या एकंदरीत कामकाजाचा व नफा-तोट्याचा आढावा घेतला असता महामंडळास गतवर्षी (२०१४-२०१५) रु.६४५.०० कोटी इतका तोटा झालेला असून संचित तोटा रु. १८३९.०० कोटी इतका झाला आहे. सदर तोटा येण्यास व वाढण्यास जी काही अनेक कारणे आहेत त्यापैकी काही वाहकांनी केलेला अपहार हे एक प्रमुख कारण असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर आहे. एप्रिल, २०११ ते मार्च २०१५ या कालावधीत ४५१ वाहकांना बडतर्फे, ९२३४ प्रकरणांमध्ये वाहकांना वेतनवाढ रोखणे/खाली आणणे व २८,९३२ प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई अशी राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

राज्य परिवहन महामंडळातील वाहकांकडून होणाऱ्या अपहारावर नियंत्रण ठेवण्यासाठी असे वाहन मार्ग तपासणी पथकास आढळून आल्यास त्यांचेविरुध्द फौजदारी कारवाई करण्याबाबत दि.०८.०५.२०१५ च्या परिपत्रकान्वे राज्य परिवहन महामंडळाद्वारा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या स्वारगेट एस.टी बस स्थानकावर मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत प्रशासनाला अपयश आल्याबाबत

**(२८) १७६९१ (१२-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या स्वारगेट एस.टी बस स्थानकावर मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत प्रशासनाला अपयश आले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बसस्थानकावर पाणी इत्यादी मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) मुख्य बसस्थानक इमारतीचे नुतनीकरण सन २००९ मध्ये करण्यात आले असून वाहनतळाचे डांबरीकरण सन २०१० मध्ये करण्यात आलेले आहे. सातारा, बारामती व सोलापूर, कोल्हापूर, सांगली उस्मानाबादकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी स्वतंत्र बसस्थानक असून बसस्थानकात प्रवाशांसाठी स्वतंत्र प्रतिक्षालय, पाणी पिण्यासाठी पाणपोई, प्रवाशांना बसण्यासाठी प्रतिक्षालयामध्ये स्टेनलेस स्टील खुर्च्या बसविण्यात आल्या आहेत. आधुनिक पध्दतीने चौकशी कक्षाची निर्मिती करण्यात आली असून प्रवाशांच्या माहितीसाठी संगणकीय उद्घोषणा, बसस्थानकामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, मेटल डिटेक्टर बसविण्यात आले आहेत.

बसस्थानकामध्ये सुलभ पध्दतीने प्रसाधनगृह असून सुलभ इंटरनॅशनल या संस्थेकडून शौचालयाची देखभाल व बसस्थानकावर स्वच्छता खाजगी ठेकेदारामार्फत केली जाते. बसस्थानकावर प्रवाशांसाठी विविध प्रकारच्या १६ वाणिज्य आस्थापना कार्यरत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील बसस्थानकातून मोठ्या प्रमाणात बसेसची वाहतुक सुरु असल्याबाबत**

**(२९) १८५७५ (१२-०८-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील बसस्थानकातून मोठ्या प्रमाणात बसेसची वाहतुक सुरु असते मात्र बसस्थानकाची जागा अपुरी असल्याने सातत्याने अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बसेसची वाढती लोकसंख्या व प्रवासी संख्या विचारात घेऊन बसस्थानकांचे विस्तारीकरण करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर बसस्थानकाचे विस्तारीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-११-२०१५) :**(१), (२), (३) व (४) कोल्हापूर येथील बसस्थानकातून दैनंदिन १४९५ बसेसचे आगमन व निर्गमन होते. मात्र सदर ठिकाणच्या अपुऱ्या जागेमुळे राज्य परिवहन बसेसचे अपघात होतात, ही बाब सत्य नाही.

कोल्हापूर बसस्थानक व आगार हे एकाच भूखंडात स्थापित असून बसस्थानकाचा विस्तार ताराबाई पार्क येथील राज्य परिहवन जागेत व विभागीय कार्यशाळा एम.आय.डी.सी. गोकूळ शिरगांव येथे स्थलांतर करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.
(५) विलंब झाला नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव तालुक्यातील इंदापूर बसस्थानकाची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याबाबत**

**(३०) १९५३३ (१६-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव तालुक्यातील इंदापूर बसस्थानकाची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बस स्थानकाच्या रंग उडालेल्या भिंती, सांडपाण्याची व्यवस्था न झाल्याने तुंबलेले पाणी, स्वच्छतागृहातून येणारी दुर्गंधी, अशा अनेक समस्यांने प्रवासी संतप्त झाले आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बस स्थानकाची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, सदर बस स्थानकाची तातडीने नुतनीकरण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-११-२०१५) :**(१), (२), (३) व (४) इंदापूर बसस्थानक सन १९५२-५३ साली बांधण्यात आले असून सदर बसस्थानकाचे नूतनीकरण करण्यासाठी अंदाजपत्रक करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाहीखाली आहे. सदर अंदाजपत्रकात बसस्थानकाची रंगरंगोटी करणे, गटारे बांधणे, स्थानकाच्या छतावर पत्र्याची शेड उभारणे, तुटलेली कुंपणभिंत बांधणे इत्यादी कामे अंतर्भूत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वैभववाडी या तालुक्याच्या ठिकाणी एस.टी. आगार उभारण्यात न आल्याबाबत

**(३१) २०३२४ (०६-०८-२०१५). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैभववाडी या नवीन तालुक्याची निर्मिती होवून सदरहू तालुका सिंधुदूर्ग जिल्हयात समावेश होवून ३० वर्षाहून अधिक कालावधी लोटलेला असतानाही या तालुक्याच्या ठिकाणांहून राज्यातील विविध जिल्हयात तसेच वैभववाडी या तालुक्यातील अनेक गावांत मोठया प्रमाणावर एसटी सेवा सुरु असतानाही आजमितीस वैभववाडी या तालुक्याच्या ठिकाणी एस.टी. आगार उभारण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैभववाडी या तालुक्याच्या ठिकाणी विनाविलंब एसटी आगार उभारण्यात यावा म्हणून त्या परिसरातील ग्रामस्थांनी तसेच एसटीतून प्रवास करणाऱ्या प्रवासांनी मागील १० वर्षापासून सातत्याने मा. मुख्यमंत्री, मा. परिवहनमंत्री, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मार्ग, परिवहन महामंडळ आदींकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैभववाडी या तालुक्याच्या ठिकाणी लवकरात लवकर एसटी आगार उभारण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-११-२०१५)** :(१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या आगार निर्मितीच्या निकषानुसार वैभववाडी येथे सद्य:स्थितीत आगार निर्मिती करण्याची आवश्यकता नाही.

मौजे वाभवे, ता.वैभववाडी येथील बसस्थानकासाठी स.नं३६-अ क्षेत्र ०.६४.३६ हेक्टरपैकी १२८५.५० चौ.मी. जमिनीची विनामुल्य मागणी दिनांक २१.१०.२०१३ रोजीच्या पत्रान्वये राज्य परिवहन महामंडळाने केली असता मसहूल विभागाने दिनांक २१.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये सदर जमीनीचे इमारतीसह मुल्यांकन रक्कम रु. ३८,०४,५३२.५० वसूल करण्याचे अटीवर कब्जे हक्काने विहीत अटी शर्तीच्या अधिन राहून सदर जमिन हस्तांतरित करण्यास मान्यता दिल्याचे राज्य परिवहन महामंडळास कळविले आहे.

तथापि, सदरचे मूल्यांकन भरणे महामंडळास शक्य नसल्याने सदरची जागा राज्य परिवहन महामंडळास विनामुल्य मिळण्याकरिता राज्य परिवहनद्वारा दिनांक ०५.११.२०१४ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवगड (जि.सिंधुदुर्ग) एसटी आगारातून देवगड-सातार्डा मार्ग पाजी अशा सोडण्यात येणाऱ्या गाडया बंद केल्याबाबत**

**(३२) २०३२८ (११-०८-२०१५). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) एसटी आगारातून देवगड-सातार्डा मार्गे पणजी अशा सकाळी ९ वाजता व दुपारी ३ वाजता सोडण्यात येणा-या गाड्या मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यापासून बंद करण्यात अले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हंगामामध्ये दोन्ही एसटी फे-या बंद केल्यामुळे एसटी प्रवाशांची अत्यंत गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील अनेक वर्षापासून बंद असलेल्या देवगड आगारातून सातार्डा मार्गे पणजीला जाणा-या व येणा-या एसटी बस चालू करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-१०-२०१५)** :(१) हे खरे आहे.

(२) व (३) देवगड येथून सातार्डा मार्गे पणजी या मार्गावर एप्रिल व मे, २०१५ मध्ये बस सेवा सुरु करण्यात आली होती. तथापि, सदर फे-यांना अत्यल्प प्रवासी प्रतिसाद मिळाला असल्याने व थेट प्रवास करणारे प्रवासी देखील नसल्याने सदरच्या फे-या स्थगित करण्यात आलेल्या आहेत.

देवगड-सातार्डा मार्गे पणजी येथे जाणा-या प्रवाशांसाठी वेंगुर्ला येथून सकाळी ०६.००, ०८.३०, ११.००, १४.४५ व ६.०० वाजता वेंगुर्ला-वास्को अशा एकूण ५ फेऱ्या सुरु आहेत. तसेच देवगड येथून पणजी येथे जाण्यासाठी देवगड-पणजी मार्गे कणकवली ०६.०० व ११.३० वा. अशा दोन फे-या चालनात आहेत, या सुविधांचा लाभ प्रवासी घेत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला परिवहन कार्यालय गेल्या ३० वर्षापासून भाडेच्या जागेत असून त्यांना स्वत:ची अशी जागा अद्यापी नसल्याबाबत**

**(३३) २१४१३ (११-०८-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला परिवहन कार्यालय गेल्या ३० वर्षापासून भाडेच्या जागेत असून त्यांना स्वत:ची अशी जागा अद्यापी मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या भाडेच्या जागेमध्ये कार्यालय आहेत त्या ठिकाणी न्यायालयाने जागा खाली करण्याचे आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत परिवहन मंडळाने जिल्हाधिकारी व शासनाकडे जागेसाठी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अकोला परिवहन कार्यालय जागा देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे,
मा. न्यायालयाच्य आदेशानुसार सदर भाड्याची जागा दिनांक ३१ मे, २०१५ रोजी खाली केली असून दिनांक ०१ जून, २०१५ पासून हे कार्यालय, विभागीय नियंत्रक, एस.टी.महामंडळ, अकोला या इमारतीत भाडे तत्वावर सुरु आहे,
(३) हे खरे आहे,
(४) उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची इमारत व इतर कामकाजासाठी मौजे खडकी येथे १० एकर खुली जागा जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडून ताब्यात घेतली असून त्याठिकाणी वाहनांची तपासणी करणे, ड्रायव्हिंग चाचणी घेणे इ. कामे सुरु आहेत, याठिकाणी इमारत बांधकामासाठी सा.बां.वि अकोला यांच्याकडे अंदाजित खर्चासंबंधी प्रस्ताव सादर केला आहे, सदर बांधकाम होईपर्यंत जिल्हा परिषद, अकोला यांची इमारत या कार्यालयासाठी तात्पुरत्या स्वरुपात भाडे तत्वावर उपलब्ध करुन देण्याकरिता जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे,
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील बसस्थानकाच्या दर्जोन्नतीबाबत

**(३४) २१८१९ (०६-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) या बस स्थानकामध्ये प्रतिदिन १०० गाडयांची आवक व जावक होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोडोली बसस्थानक राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २०४ व राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ या महामार्गांना जोडणाऱ्या राज्य मार्गावर स्थीत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवाशांच्या व कर्मचाऱ्यांच्या सोईसाठी या बस स्थानकाला आगाराचा दर्जा देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-१०-२०१५) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) कोडोली बसस्थानक हे कोल्हापूर मध्यवर्ती बसस्थानकापासून ३३.२ व शिराळा बसस्थानकापासून २१.५ कि.मी. अंतरावर आहे. कोडोली बसस्थानकावरुन कोल्हापूर ३३, इचलकरंजी २४, मलकापूर ३५, इस्लामपूर १७, मिरज ०२, शिराळा ३२ अशा एकूण १४३ फेऱ्या चालनात आहेत. या बसस्थानकावर ०९.०० ते १७.०० अशा पातळ्यामध्ये वाहतूक नियंत्रकांची नेमणूक केलेली असून या ठिकाणी विद्यार्थी तसेच कर्मचारी वर्गांना पास देण्याची सोय प्रवाशांना, आगावू आरक्षण देण्याची सोय उपलब्ध आहे. महामंडळाने कोडोली बसस्थानकात प्रवाशांच्या व कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी पुरेशा सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. महामंडळाचे आगार निर्मिती विषयक मार्गदर्शक तत्वे लक्षात घेता, कोडोली या बसस्थानकाला आगाराचा दर्जा देणे शक्य नाही,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) येथील मातृतिर्थ नगरीतील बस स्थानकांचा कारभार एस.टी. महामंडळाच्या मेहकर आगारातून चालविण्यात येत असल्याबाबत

**(३५) २२३३३ (०६-०८-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेड राजा( जि.बुलढाणा) येथील मातृतिर्थ नगरीतील बस स्थानकाचा कारभार एस.टी. महामंडळाच्या मेहकर आगारातून चालविण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) सिंदखेड राजा येथे एस.टी. चे स्वतंत्र आगार मंजूर करण्याचा प्रस्ताव बस प्रमुखांनी एस.टी. महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक प्रवाशांना सोई-सुविधा देण्यासाठी सिंदखेड राजा येथे स्वतंत्र्य आगार मंजूर करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-११-२०१५)** :(१), (२) व (३) राज्य परिवहन बुलढाणा विभागाच्या मेहकर आगारातर्गत कार्यान्वित असलेल्या मातृतिर्थ नगरीतील बसस्थानकाचा कारभार राज्य परिवहन मेहकर आगारात चालविण्यात येत असलेली बाब खरी आहे.

महामंडळाच्या धोरणात्मक निर्णयानुसार नविन आगार निर्मितीच्या निकषानुसार सिंदखेडराजा, जि.बुलढाणा येथे आगार निर्मिती विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विद्यार्थी, पोलीस, अपंग व्यक्ती पत्रकार, वरिष्ठ नागरिक अशा समाजातील विविध घटकांना प्रवास भाडयात सवलत देण्याबाबत**

**(३६) २२५५४ (०६-०८-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटी महामंडळाद्वारे एस.टी. तून प्रवासासाठी शासनाच्या आदेशानुसार विद्यार्थी, पोलीस, अपंग व्यक्ती पत्रकार, वरिष्ठ नागरिक अशा समाजातील विविध घटकांना प्रवास भाडयात सवलत देते, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, त्याचे पैसे एस.टी. महामंडळाकडून दिले नसल्याने जवळजवळ २ हजार कोटी रक्कम सरकारकडून एस.टी.महामंडळाला देणे बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदरहू थकित रक्कम एस.टी.महामंडळाला देण्याबाबत शासनाने काय काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-१०-२०१५)** :(१) व (२) हे खरे आहे.

(३) सवलत मुल्यांची प्रतिपूर्ती मिळण्यासाठी संबंधित विभागांकडे पत्रव्यवहार केला असून त्याबाबतचा पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी या पदावर अनेक दिवसापासून नियमित अधिकारी नसून प्रभारी अधिकारी असल्याबाबत**

**(३७) २२६४७ (०६-०८-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी या पदावर अनेक दिवसापासून नियमित उपप्रादेशिक परिवहन अधिकारी नसून प्रभारी अधिकारी असल्यामुळे परिवहन कार्यालयाच्या कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हिंगोली या पदावर नियमित स्वरूपात उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनेक दिवसांपासून न राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) सदर ठिकाणी नियमित स्वरूपात उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येईल काय ?

**श्री. दिवाकर रावते (१९-१०-२०१५) :**(१), (२) व (३) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, हिंगोली येथील उप प्रादेशिक परिवहन अधिकारी या रिक्त पदाचा कार्यभार सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड यांचेकडे सोपविण्यात आला होता. दि.२६/०८/२०१५ रोजीच्या शासन आदेशान्वये सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी या संवर्गातून पदोन्नतीने उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, हिंगोली हे पद भरण्यात आले आहे.

---

## राज्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या गाड्यांमधील तसेच मुंबईतील बेस्टच्या गाड्यांमधील प्रथमोपचार पेटीत औषधे नसल्याबाबत

**(३८) २२६९३ (०८-०९-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बहुतांश गाड्यांमधील तसेच मुंबईतील बेस्टच्या बहुतांश गाड्यांमधील प्रथमोपचार पेटीत औषधे नसल्याची बाब माहे जून, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे आणि सदरहू प्रथमोपचार पेट्यांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेविषयी किमान प्राथमिक स्तरावरील उपचारासाठी आवश्यक असलेली औषधे उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-११-२०१५) :**(१) राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसचे दरवर्षी वाहन परवाना नुतनीकरण केले जाते. त्यावेळी प्रथमोपचार पेटी व प्रथमोपचार औषधे या बाबी बसेसमध्ये बसवणे मोटार वाहन कायदा सी.एम.व्ही.आर. १९८९ प्रमाणे बंधनकारक आहे. प्रथमोपचारपेटी व साहित्याची तपासणी करुनच बसेस आरटीओ कार्यालयाकडून पास केल्या जातात.

बेस्ट उपक्रमाची बससेवा मुंबई महानगर क्षेत्रातील परिसरात कार्यरत आहे. तेथे वैद्यकीय मदत सहज उपलबध होऊ शकते. त्यामुळे बेस्ट उपक्रमाच्या बसमध्ये प्रथमोपचार पेटी लावण्याबाबत महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम १९२ नुसार सूट देण्यात आली आहे.

(२) व (३) प्रथमोपचार साहित्य खरेदी करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाद्वारा दिनांक ०३.१०.२०१२ च्या परिपत्रकानुसार सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्य परिवहन बसेसमध्ये प्रथमोपचार पेटी व प्रथमोपचार साहित्य पुरविण्यासाठी सन २०१५-१६ करीता करार करण्यात येवून सदर कराराची मुदत दि.१२.०७.२०१६ पर्यंत आहे.

नवीन बस सांगाड्यांची खरेदी करतांना बस सांगाड्यांमध्ये प्रथमोपचार पेटी साहित्याचा किटसह पुरवठा हात असल्यामुळे ते साहित्य नवीन बसबरोबर पुरविण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे स्टेशन व शिवाजीनगर बसस्थानकाकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याबाबत**

**(३९) २३५६१ (०६-०८-२०१५). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे स्टेशन व शिवाजीनगर बसस्थानकाकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले असल्याचे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर स्थानकातील वेश्या व्यावसायिक, मद्यपी, पाकीटमारांची संख्या जास्त असल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित झाला आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवाश्यांच्या सुरक्षिततेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-१०-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) पुणे स्टेशन व शिवाजीनगर बसस्थानकावर राज्य परिवहन प्रशासनाकडून पोलीस कक्षासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ध्वनिक्षेपनाव्दारे प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व चोर, खिसेकापू, पाकिटमारापासून सावध राहण्याबाबत बसस्थानकावरुन वांरवार सूचना दिल्या जातात व सुरक्षिततेच्या दृष्टीने बसस्थानकावर सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत आणि कामगिरीवरील चालक/वाहकांना याबाबत सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली येथे बीओटी तत्वावर नवीन बसस्थानक बांधण्याबाबतत**

**(४०) २३५८५ (११-०८-२०१५). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथील राज्य परिवहन महामंडळाचे मध्यवर्ती बस स्थानक अनेक वर्षापूर्वीचे जुने असल्यामुळे या ठिकाणी बस वाहतुकीची कोंडी होऊन याचा प्रवाशांना त्रास होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे पूर्वीचे जुने बस स्थानक पाडून याच ठिकाणी बीओटी तत्वावर नवीन बसस्थानक बांधण्याबाबतत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) सांगली येथील जुने बसस्थानक पाडून सन ऑक्टोबर, २०१४ मध्ये माधवनगर येथे छोटेखानी बसस्थानक व आगार कार्यशाळा बांधणे व सांगली येथे प्रशस्त बसस्थानक व्यापारी संकुलासह बांधा वापरा-हस्तांतर करा या तत्वावर बांधून देणेबाबत ई निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. मात्र त्यास प्रतिसाद न मिळल्याने पुढील कार्यवाही झाली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कात्रज (जि.पुणे) एसटी थांब्यावर स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सोय, बसण्याकरिता आसने तसेच सभोवताली दिवे नसल्याबाबतची तक्रारीकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत**

**(४१) २३७०१ (११-०८-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कात्रज (जिल्हा) पुणे चौकातील मध्यवर्ती एसटी थांब्यावरुन पणजी, कोकण कोल्हापूर, सातारा, सांगली येथे दिवसभरात ३०० ते ४०० गाड्या जात असून हजारो प्रवाशी येत असतांनाही या एसटी थांब्यावर स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सोय, बसण्याकरिता आसने तसेच सभोवताली दिवे नसल्याबाबतची तक्रार प्रवाशांनी वारंवार संबंधित अधिकाऱ्यांकडे केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तक्रारीकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या एसटी थांब्यावर प्रवाशांकरिता आवश्यक त्या सोयी सुविधा व सुरक्षेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-१०-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) पुणे-सातारा मार्गावरील कात्रज चौक, जि.पुणे येथे प्रवाशांची चढ-उतार करण्यासाठी बसथांबा देण्यात आला असून विनावाहक फे-यांचे बुकींगसाठी दोन पाळ्यांमध्ये वाहक नियुक्त करण्यात आलेले आहेत. याठिकाणी मार्ग निवारा बांधण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या मालकीची जागा नसल्यामुळे विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, पुणे यांच्याकडून जागा उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका आणि उपायुक्त, भूसंपदान व व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका यांचेकडे पत्रव्यवहाराद्वारे विनंती करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती आगराला नविन बसेस पुरविण्याबाबत

**(४२) २४०७५ (०६-०८-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती आगारातील एस.आर.डी.सी च्या जवळपास ५०% बसेस नादुरुस्त असून त्यासाठी साहित्याची पुर्तता होत असल्याने संयुक्त एस.टी कर्मचारी समितीने दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी त्यासुमारास कामबंद आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने साहित्याचा पुरवठा तसेच नविन बसेस अमरावती आगाराला पुरविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-१०-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.

अमरावती आगारातील नादुरुस्त बसेसची संख्या १०% पेक्षा कमी आहे. कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले होते ही बाब खरी आहे.

(२) अमरावती आगाराकरिता गत ३ वर्षामध्ये ३१ व चालू वर्षी माहे जुलै, २०१५ पर्यंत ८ अशा एकूण ३१ नविन वाहनांचा पुरवठा करण्यात आला असून याच कालावधीत १६ बसेस मोडीत काढल्या आहेत.

महामंडळाच्या धोरणाप्रमाणे प्रवासी वाहने मोडीत काढण्याचे आयुर्मान १० वर्षावरुन ८ वर्षापर्यंत भांडवली उपलब्धतेनुसरी टप्याटप्याने अंमलात आणण्याचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. मात्र, राज्य परिवहन, अमरावती आगारातील बसेसचे सरासरी आयुर्मान ४ वर्षे ९ महिने इतके आहे.

आगारास सामानाचा पुरवठा नियमित केला जात असून आगारांमध्ये वाहनांची देखभाल नियोजित कार्यक्रमांतर्गत दैनिक, दशदिनीय, त्रैमासिक डॉकिंग अशा प्रकारे करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देवरी (जि.गोंदिया) तालुक्यात परिवहन विभागाचे सिमा तपासणी केंद्र सुरु करण्याबाबत

**(४३) २४०९१ (०६-०८-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.देवरी, जिल्हा गोदिंया येथील एन.एच.६ वरील परिवहन विभागाचे सिमा तपासणी केंद्राची पूर्ण इमारत व इतर सोयींनी सदर सिमा तपासणी केंद्र तयार असून अजुनपर्यंत सदर सिमा तपासणी केंद्रे सुरु झालेले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शासनाचे महसुलीमध्ये फारच नुकसान होत आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सिमा तपासणी केंद्र सुरु करण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

सदर सिमा तपासणी नाक दि.०७.०८.२०१५ पासून कार्यान्वित झाला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना परिवहन खात्याच्या नोकरभरतीत प्राधान्य देण्याबाबत**

**(४४) २४४२१ (०६-०८-२०१५). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना परिवहन खात्याच्या नोकरभरतीत प्राधान्य देण्यात येईल अशी घोषणा परिवहन मंत्री महोदयांनी दिनांक ४ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या मा.परिवहन मंत्री महोदयांनी केलेल्या घोषणेनुसार उक्त प्रश्नाबाबत कोणती अंमलबजावणी करण्यात आली,

(३) असल्यास, आतापर्यंत किती राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना परिवहन विभागानी नोकऱ्या दिल्या त्याचा तपशील काय आहे ,

(४) तसेच राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना परिवहन विभागात नोक-या देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-१०-२०१५) :**(१) होय.

(२), (३), (४) व (५) राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना नोकरभरतीत प्राध्यान्य देता येईल किंवा कसे, याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**मोहदा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) या गावी दारुबंदी करण्याबाबत**

**(४५) २४८६२ (३०-०७-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहदा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) या गावी ५० टक्के महिलांनी दारुबंदी करावी अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांना केली आणि तसा शासन निर्णय असताना सुध्दा बऱ्याच गावात यांची अमंलबजावणी होताना दिसत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-१०-२०१५)** :(१) व (२) हे खरे नाही. तथापि ग्रामपंचायत मोहदा येथे दारुबंदी करण्याबाबतचे प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील एस.टी. महामंडळाच्या माणगाव-श्रीवर्धन मार्गावरील एस.टी.बस. नादुरुस्त वाहने बंद करण्याबाबत

**(४६) २५०८० (०६-०८-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एस.टी. महामंडळाच्या माणगाव-श्रीवर्धन मार्गावरील एस.टी.बस. मध्ये जास्त प्रवासी भरुन माणगाव पुढील घाट चढत असताना ब्रेक व क्लच काम करण्याचे अचानग बंद होऊन बस मागे येऊनदरीत कोसळून मोठी दुर्घटना/मनुष्य हानी होण्याची घटना प्रवाशांच्या व इतर वाहन चालकांच्या प्रसंगवधानामुळे बसच्या मागील टायरना दगडांचा अडसर लावल्यामुळे सदरहू आपघात टळण्याची बाब दिनांक ७ जून,२०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील एस.टी. महामंडळाच्या मालकीच्या बसेस खराब, नादुरुस्त अवस्थेत असताना ही ग्रामीण भागात त्यांचा वापर केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील नादुरुस्त, खराब वाहने कायम स्वरुपी बंद करुन त्याऐवजी नवीन वाहने वापरात आणण्याची मागणी जागरुक नागरिक, विविध प्रवासी/एस.टी कर्मचारी संघटना, लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (परीवहन) यांच्याकडे माहे एप्रिल वा २०१५ वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत नादुरुस्त वाहने बंद करुन त्याऐवजी नवीन वाहने वापरात आणण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-११-२०१५)** :(१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) रायगड विभागातून एकूण ४२३ नियते चालविण्यात येत असून त्यासाठी एकूण ५१२ बसेस उपलब्ध आहेत. मागील तीन वर्षात ऑगस्ट, २०१५ अखेर माणगांच आगारास ११, श्रीवर्धन आगारास २१, रायगड विभागास ११९ नवीन वाहने दिली असून या कालावधीत माणगांव व श्रीवर्धन आगारातून तसेच रायगड विभागातून एकूण १०३ वाहने मोडीत काढण्यात आली आहेत.
राज्य परिवहन प्रवासी बसेसचे आयुर्मान १० वर्षावरुन ८ वर्षापर्यंत भांडवली उपलब्धतेनुसार टप्याटप्याने अंमलात आणण्याचे धोरण राज्य परिवहनाद्वारा निश्चित करण्यात आलेले आहे, राज्य परिवहन महामंडळामधील उपलब्ध बसेसचे सरासरी आयुर्मान ४.०९ वर्ष व ६.०८ लाख कि.मी. एवढे असून रायगड विभागातील उपलब्ध बसेसचे सरासरी आयुर्मान ४.०८ वर्ष व ४.७६ लाख कि.मी एवढे आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिशोर घाटात एस.टी. बसला झालेला अपघात**

**(४७) २५१७६ (०६-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नड डेपोची एस.टी.बस पिशोर घाटात दुर्घटनाग्रस्त झाली असून या अपघातात नाचनवेल येथील ६५ वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाला असून बसमधील २३ प्रवासी गंभीर जखमी झाले असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, या अपघाताची शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास,चौकशीअंती मृत्यू झालेल्या महिलेच्या कुटुंबाला तसेच २३ गंभीर जखमी झालेल्या प्रवाश्यांना शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-१०-२०१५) :**(१) व (२) होय.

(३) सदर अपघातात मृत्यू झालेल्या महिला प्रवाशाच्या कुटुंबाला रु. १०,०००/- देण्यात आले असून त्याचे वारसास "पी" फॉर्म देण्यात आला आहे. मात्र, मयताच्या नातेवाईकांनी न्यायालयात दावा दाखल केला असल्यामुळे नुकसान भरपाई अदा करता आली नाही.

अपघातात २१ प्रवासी व कर्तव्यावरिल चालक/वाहक असे २३ जण जखमी झाले असून २१ जखमी प्रवाशांपैकी १४ जखमी प्रवाशांना रु. १३,०००/- आर्थिक तत्कालिन मदत देण्यात आली. तसेच सर्व जखमी प्रवाशांना "पी" फॉर्म देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हयातील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ)**
**कर्मचाऱ्यांसाठी सुविधा नसल्याबाबत**

**(४८) २६१७६ (१२-०८-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) एस.टी. महामंडळास विभागीय कार्यालयात स्थानांतरित झाले आहे परंतु, या कार्यालयात कर्मचा-यांसाठी सुविधा नसल्यामुळे झाडाखाली बसून मोटरवाहन निरिक्षकांना काम करावे लागत असल्याचे दिनांक ३१ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्हयातील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) एस.टी. महामंडळास विभागीय कार्यालयात सुविधा पुरविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-११-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

विभाग नियंत्रक, अकोला यांनी उपप्रादेशिक कार्यालय, अकोला करिता त्यांची वापरात नसलेली कॅन्टीनची जागा व त्यास लागून एक कक्ष असे मिळून एकूण १४२८ चौ.फुट एवढीच इमारत उपलब्ध करुन दिली आहे. सदर जागा अपूरी पडत आहे.

(२) विभाग नियंत्रक, एसटी महामंडळ, अकोला यांना त्यांच्या इमारतीमधील अतिरिक्त कक्ष उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. तसेच जिल्हा परिषद, अकोला यांची इमारत या कार्यालयासाठी तात्पुरत्या स्वरुपात भाडे तत्वावर उपलब्धकरुन देण्याकरिता जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे.

उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची इमारत व इतर कामकाजासाठी मौजे खडकी येथे १० एकर खुली जागा जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडून घेतली असून त्याठिकाणी वाहनांची तपासणी करणे, ड्रायव्हिंग चाचणी घेणे इ.कामे सुरु आहेत. याठिकाणी इमारत बांधकामासाठी सा.बां.वि. अकोला यांच्याकडे अंदाजित खर्चासंबंधी प्रस्ताव सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई-गोवा महामार्गाच्या पनवेल-पळस्पे ते इंदापूर रस्ता रुंदीकरणाच्या कामात घरे, मंदिरे, तसेच एसटी बसथांबे हटविण्यात आल्याबाबत**

**(४९) २६५०६ (१२-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाच्या पनवेल-पळस्पे ते इंदापूर ८४ कि.मी. लांबीच्या रस्ता रुंदीकरणाच्या कामात या भागात महामार्गालगत असलेली घरे, मंदिरे, तसेच एसटी बसथांबे हटविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तात्काळ एसटी बसथांबे न उभारल्यास प्रवाशांनी तीव्र आंदोलन करण्याचा पवित्रा घेतला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. दिवाकर रावते (२९-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) रस्ता रुंदीकरणाच्या कामात राज्य परिवहन महामंडळाचे बसथांबे हटविण्यात आले आहेत. महामार्गाच्या रुंदीकरणात हटविण्यात आलेले मार्गनिवारे महामार्गाचे रुंदीकरणाचे काम झाल्यानंतर ते पुन्हा बांधून मिळण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावरुन संबंधित प्राधिकरणाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातुन जाणा-या सोलापूर ते जळगाव रेल्वे मार्गाचे कामाबाबत**

**(५०) २७५२१ (१२-०८-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातुन जाणा-या सोलापूर ते जळगाव रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण झालेले असून ते काम अद्याप मार्गी लागलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा रेल्वे मार्ग झाला तर कुलस्वामिनी आई तुळजाभवानी वास्तव्य असलेले तुळजापूर रेल्वेच्या नकाशावर येणार आहे, त्याचबरोबर मराठवाडयातील अनेक गावे रेल्वेला जोडली जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील प्रवाश्यांची मागणी तसेच उस्मानाबाद सारख्या मागासलेल्या जिल्ह्याच्या विकासासाठी या रेल्वे मार्गाकरिता शासनस्तरावरुन कोणता पाठपुरावा करण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-१२-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदर प्रकल्पाचा सर्वेक्षण अहवाल रेल्वे मंत्रालयास २५.३.२०१३ रोजी सादर करण्यात आला आहे. प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ३२३८ कोटी व वार्षिक परतावा दर (-) ५.६९% आहे. रेल्वे बोर्डाने प्रकल्प स्थगित ठेवला आहे. प्रकल्पास रेल्वे मंत्रालयाची अद्याप मंजूरी मिळालेली नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.